स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद





रयत शिक्षण संस्थेचे,

# राधाबाई काळे महिला महाविद्यालय,
# अहमदनगर.

# प्रतिबिंब


जून २०१८ ते ऑगस्ट २०१८

विद्यार्थिनी संचलित वार्तापत्र... [ वर्ष दुसरे : अंक : १ ]


## संपादक मंडळ

१. कु. अर्चना भिटे - एम.एससी. केमिस्ट्री.
२. कु. कॅथरीन क्षेत्रे - एम.ए. इंग्रजी.
३. कु. रुपाली मोरे - टी.वाय. बीएससी.
४. कु. प्रगती मिसाळ - टी.वाय.बी.ए.
५. कु. प्रतीक्षा कड - एस.वाय.बी.कॉम.



## मार्गदर्शन

१. डॉ. भाऊसाहेब औटी
२. डॉ. मनोहर करांडे
३. प्रा. रामचंद्र राऊत
४. डॉ. सुभाष आहेर
५. डॉ. भुपेंद्र निकाळजे

## प्रथम वर्ष कला स्वागत समारंभ व अभिभाषण



प्रथम वर्ष कला विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ दिनानाथ पाटील

महाविद्यालयामध्ये प्रथम वर्ष कला स्वागत समारंभ व अभिभाषण या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करतात. प्राचार्य डॉ. दिनानाथ पाटील म्हणाले की, विद्यार्थिनींनी पदवी प्राप्त करणे म्हणजे शिक्षण नव्हे तर आपल्या ज्ञानाचा समाजासाठी वापर करता आला पाहिजे. केवळ गुण प्राप्त करुन मोठे होता येत नाही. त्यामुळे गुणवंत होण्यापेक्षा प्रज्ञावंत व्हा असा अनमोल संदेश त्यांनी दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. सुभाष आहेर यांनी केले तर प्रा. अमोल बुचुडे यांनी आभार मानले.

## आंतरराष्ट्रीय योग दिन



योगाचे प्रात्यक्षिक व मार्गदर्शन करताना डॉ हेमा सेलोत

राधाबाई काळे महिला महाविद्यालयामध्ये आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने योगाचे प्रात्यक्षिक व मार्गदर्शन निसर्ग उपचार व आरोग्यवर्धिनी संस्थेच्या डॉ. हेमा सेलोत यांनी केले. या प्रसंगी त्यांनी योगसाधनेचे महत्त्व सांगितले. सुमारे पाच हजार वर्षांची परंपरा असणारे योगशास्त्र शरीर व मनाला अतिशय लाभदायक आहे. आधुनिक जगातील अनेक समस्यांचे निराकरण योगसाधनेत आहे. योग शरीर तंदुरुस्त ठेवतो व आरोग्यमय जीवनासाठी योग आवश्यक असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. या योगाच्या प्रात्यक्षिकात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनानाथ पाटील, शिक्षक व शिक्षकेतर सेवक आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

## मांजरसुंबा येथे वृक्षारोपण



वृक्षारोपण करताना डॉ.संगिता कुलकर्णी व विद्यार्थिनी

महाराष्ट्र शासनाच्या हरित महाराष्ट्र अभियानांतर्गत रयत शिक्षण संस्थेच्या राधाबाई काळे महिला महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी मांजरसुंबा येथे डोंगराच्या पायथ्याशी सुमारे ७० वृक्षांचे रोपण केले. या प्रसंगी मांजरसुंबा गावातील सरपंच गावकरी उपस्थित होते. या वृक्षारोपण कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक व महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनानाथ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या प्रसंगी एन.एस.एस. चे कार्यक्रम अधिकारी प्रा. सहदेव आव्हाड, डॉ . संगीता कुलकर्णी, डॉ. सुमन पवार, प्रा. रामचंद्र राऊत यांनी हा उपक्रम परिश्रमपूर्वक यशस्वी केला.

## यशस्वी होण्यासाठी वाचन संस्कृती गरजेची

२१ व्या शतकाला स्पर्धेचे युग समजले जाते. या स्पर्धेच्या युगात यशस्वी व्हायचे असेल तर वाचन संस्कृती जोपासणे आवश्यक आहे. चांगली पुस्तके लगेच कळत नाहीत. त्यासाठी त्यांना वाचावंच लागतं. नाण्याला जशा दोन बाजू असतात तसेच फक्त बुद्धी, चातुर्य असून चालत नाही तर त्याला वाचनाचीही जोडी आवश्यक आहे.

याच उद्देशाने राधाबाई काळे महिला महाविद्यालयात पुस्तक प्रदर्शन भरविण्यात आले होते. हे पुस्तक प्रदर्शन श्री. रंगनाथन यांच्या जन्मदिनाप्रित्यर्थ भरविण्यात आले होते. या पुस्तक प्रदर्शनामध्ये कथा, कादंबऱ्या, संदर्भ पुस्तके, काव्य संग्रह तसेच आत्मचरित्र अशा विविध प्रकारची पुस्तके ठेवण्यात आली होती.



पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन करताना कु.प्रगती मिसाळ समवेत प्राचार्य डॉ.दिनानाथ पाटील व विद्यार्थिनी

या पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन विद्यार्थी प्रतिनिधी कु. प्रगती मिसाळ हिच्या हस्ते झाले. या उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनानाथ पाटील, उपप्राचार्य डॉ.भाऊसाहेब औटी, तसेच सर्व शिक्षक वृंद व विद्यार्थिनी उपस्थित होत्या. विद्यार्थिनींनी मोठ्या प्रमाणावर उपस्थित राहून पुस्तक प्रदर्शनाचा आस्वाद घेतला. तसेच स्वत:चे अभिप्राय देखील नोंदविले.

हे पुस्तक प्रदर्शन सकाळी 10 ते सायंकाळी 6 वाजेपर्यंत सुरु होते. विद्यार्थिनींमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी तसेच विद्यार्थिनींच्या ज्ञानात भर पडावी व त्यांना विविध पुस्तकांची माहिती मिळावी या उद्देशानेच हे पुस्तक प्रदर्शन भरविण्यात आले होते. आजच्या काळामध्ये मोबाईलच्या वाढत्या वापरामुळे वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे. त्यामुळेच वाचन संस्कृतीचे जतन व जोपासना करण्यासाठी व या भरकटत चाललेल्या आजच्या तरुण पिढीला ज्ञानाच्या प्रवाहात आणण्यासाठी वाचन संस्कृती वाढविणे महत्त्वाचे आहे. प्रत्येक विद्या ही एका सुंदर रोपाप्रमाणे असते. तिला निष्ठेचे व मनाच्या एकाग्रतेचे खत व वाचनाची आवश्यकता असते.

## डॉ. सुभाष आहेर यांना साहित्यसेवा पुरस्कार प्रदान

राधाबाई काळे महिला महाविद्यालयातील मराठी विषयाचे प्रा.डॉ. सुभाष आहेर यांना साहित्य सेवेतील योगदानाबद्दल राष्ट्रीय बंधुता साहित्य परिषद,पुणे यांच्या

वतीने प्रबुद्ध साहित्यिक बाबाभारती साहित्यसेवा पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला.



बंधुताचार्य प्रकाश रोकडे यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारतांना डॉ.सुभाष आहेर, सोबत प्राचार्य डॉ.अशोक पगारिया व कवी चंद्रकांत वानखेडे

प्रा.डॉ. सुभाष आहेर यांनी अंधारातील आई, घे भरारी, विचारमंथन, साहित्य : एक शोध, भाषा - उपयोजन व सर्जन, आरपार बंधुता, सेट-नेट पेपर पहिला आदी पुस्तकांचे लेखन केलेले आहे.त्याचप्रमाणे अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनमुक्ती अभियान, पर्यावरण संवर्धन अशा सामाजिक उपक्रमांमध्येही ते कृतीशील राहिलेले आहेत. आतापर्यंत त्यांनी विविध विषयावर व्याख्याने देऊन सामाजिक प्रबोधनाचेही काम केलेले आहे. यापूर्वी त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून गुणवंत आदर्श शिक्षक पुरस्कार, पर्यावरण मित्र पुरस्कार, व्यसनमुक्तीदूत पुरस्कार त्यांना प्राप्त झालेले आहेत.

या यशाबद्दल संस्थेचे सचिव प्राचार्य मा. डॉ. भाऊसाहेब कराळे, महाविद्यालय स्थानिक विकास समितीचे अध्यक्ष मा. आशुतोष काळे, मा.आ.दादाभाऊ कळमकर, सर्व शिक्षक-शिक्षकेतर सेवकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## एक राखी जवानो के लिए



एक राखी जवानांसाठीचे संकलन करताना कु.रूपाली मोरे व विद्यार्थिनी

दि.24 ऑगस्ट 2018 रोजी राधाबाई काळे महिला महाविद्यालय यामध्ये एक राखी जवानों के लिए हा कार्यक्रम आयोजित केला. यामध्ये बहुसंख्य मुलींनी सहभाग नोंदवला. यामध्ये विद्यार्थिनींनी एक राखी व त्यासोबत आपल्या सिमेवर रक्षण करणाऱ्या भावांसाठी त्यांच्या कार्यास प्रेरणा मिळेल असे पत्र लिहिले. यामध्ये सर्व जवानांना दीर्घ आयुष्य प्राप्त होवो अशी विद्यार्थिनींनी प्रार्थना केली.

## एड्स विषयी युवक युवतींमध्ये जनजागृती

जिल्हा रुग्णालय अहमदनगर यांच्या सहकार्याने राधाबाई काळे महिला महाविद्यालयामध्ये आंतरराष्ट्रीय युवा दिनाच्या निमित्ताने एड्स विषयी समाजामध्ये असलेले गैरसमज याबाबत डॉ. सुनील गिरी यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी त्यांनी समाजामध्ये एच.आय.व्ही. च्या अनुषंगाने तो एक कलंक व भेदभाव म्हणजे काय व तो दूर कसा करता येईल या बाबत विवेचन केले.



आंतरराष्ट्रीय युवा दिनाच्या निमित्ताने मार्गदर्शन करताना डॉ.सुनील गिरी

या प्रसंगी जिल्हा रुग्णालय अहमदनगर येथील डॉ.शिवाजी जाधव, डॉ.शर्मिला म्हस्के, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. सहदेव आव्हाड आदि उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. गफुर शेख होते. प्रास्ताविक डॉ. रविप्रकाश ठोंबरे यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. श्रीमती शुभांगी ठुबे यांनी केले. प्रा. श्रीमती फातेमा अंबेकर यांनी आभार मानले.

## कु. माधवी दुर्गैय्या सेट परीक्षा उत्तीर्ण



सेट परीक्षा उत्तीर्ण झाल्या बद्दल सत्कार करतांना व्हा.चेअरमन ॲड.भगिरथ शिंदे, सह सचिव महाडीक साहेब मा.आ.दादाभाऊ कळमकर व प्राचार्य डॉ. दिनानाथ पाटील

राधाबाई काळे महिला महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागातील एम.एस्सी. भाग 2 मधील विद्यार्थिनी कु.माधवी दुर्गैय्या ही सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने घेतली सेट परीक्षा जानेवारी 2018 परीक्षेत उत्तीर्ण झाली असून तिच्या या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन मा. डॉ . अनिल पाटील, व्हा. चेअरमन ॲड. भगिरथ शिंदे, संस्थेचे सचिव प्रिं.डॉ. भाऊसाहेब कराळे, उत्तर विभागाचे अध्यक्ष मा. दादाभाऊ कळमकर, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष मा. आशुतोष काळे व प्राचार्य डॉ. दिनानाथ पाटील यांनी तिचे अभिनंदन केले.

## कु.पूजा राठोडची क्रॉसकंट्री स्पर्धेसाठी निवड

जिल्ह्यातील एकमेव महिला महाविद्यालय अशी ओळख असलेले अहमदनगर शहरातील राधाबाई काळे महिला महाविद्यालयातील कु.पूजा राठोड (प्रथम वर्ष कला) या विद्यार्थिनीने क्रॉसकंट्री या स्पर्धेतून आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी पुणे विद्यापीठाच्या संघात निवड झाली आहे. ही स्पर्धा नाशिक येथे झाली. त्याबद्दल महाविद्यालयातर्फे तिचे अभिनंदन करण्यात आले.


## मला आवडलेले पुस्तक



मला आवडलेले पुस्तक यावर मनोगत व्यक्त करताना कु.अमृता साळवे, प्राचार्य डॉ.दिनानाथ पाटील व डॉ.सुभाष आहेर

दि. 01.08.2018 या दिवशी मराठी विभागाअंतर्गत मला आवडलेले पुस्तक हा उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन हे विद्यार्थिनींनी केले होते. त्यांनी वाचलेल्या पुस्तकांपैकी त्यांना जे पुस्तक आवडले त्यावर त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी मनोगतातून जे विचार मांडले ते प्रेरणादायी होते. अध्यक्षस्थानी मा. प्राचार्य डॉ. दिनानाथ पाटील होते प्रास्ताविक प्रा. डॉ. सुभाष आहेर यांनी केले. तसेच सहभागी विद्यार्थिनी कु. अमृता साळवे, कु. पूजा शिंदे, धनश्री गव्हाणे, श्रूती ढवळे ,कु.आश्विनी झिने इ. विद्यार्थिनींनी पहिल्यांदाच स्टेजवर येऊन आपले विचार उत्कृष्टरीत्या मांडले. अध्यक्ष प्राचार्य डॉ. दिनानाथ पाटील यांनी मुलींचे कौतुक करुन वाचनाचे महत्त्व सांगितले.या प्रसंगी वेगवेगळ्या शाखेतल्या विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## शास्त्रज्ञांकडून पृथ्वीच्या नव्या नकाशाची निर्मिती



कॅलिफोर्निया : आजपर्यंत आपण पृथ्वीचा जो नकाशा पाहत आलो, शिकत आलो आहे तो जर चुकीचा आहे असे सांगितल्यावर तुमच्या भुवया उंचावल्याशिवाय राहणार नाहीत. सध्या जगभरात पृथ्वीचे जे काही नकाशे म्हणून वापरले जातात, त्यांच्यात काही ना काही उणिवा निश्चितपणे आहे. काही महाद्विपांच्या आकाराशी थोडी का होईना निश्चितपणे छेडछाड करण्यात आली आहे.

सध्या अस्तित्वात असलेल्या नकाशातील तमाम उणिवा दूर करण्याचा प्रयत्न करताना शास्त्रज्ञांनी पृथ्वीचा नवा नकाशा तयार केला आहे. या नव्या नकाशाला शास्त्रज्ञांनी इक्वल अर्थ असे नाव दिले आहे. अनेक शास्त्रज्ञांनी तर पृथ्वीचा हा नकाशा अत्यंत अचूक असल्याचे मत व्यक्त केले आहे.

कॅलिफोर्निया येथील एनव्हायरमेंटल सिस्टिम रिसर्च इन्स्टिट्यूटचे बोजन सावरिक मिलवॉकीस्थित नॉर्थ अमेरिकन कार्टो ग्राफिक इन्फॉर्मेशन सोसायटीचे टॉम पॅटर्नसन आणि मेलबोर्नच्या मोनॅश युनिव्हर्सिटीचे बर्नहार्ड जेनी यांनी दीर्घकाळ संयुक्त संशोधन आणि प्रयत्न करुन हा नकाशा तयार केला.

वरील तीन शास्त्रज्ञांनी तयार केलेला नकाशा अचूक असून यामध्ये देशादेशांमधील अंतर अगदी बरोबर दाखवण्यात आले आहे. हा नकाशा अगदी पृथ्वीच्या रचनेसारखाच आहे. या नकाशामुळे संपर्क व वाहतुकीसाठी माहिती मिळण्यास मदत होणार आहे.

- कु. शुभांगी शिंदे /कु. पायल मेहेत्रे
तृतीय वर्ष कला

## जीवनाची संधी समजून स्पर्धा परीक्षाकडे पाहावे



स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. बाळ कांबळे व प्राचार्य डॉ. दिनानाथ पाटील

स्पर्धा परीक्षा जीवनाची एक संधी समजून त्याकडे पाहावे. विशिष्ट ध्येय डोळ्यासमोर ठेवून प्रयत्न केल्यास यश निश्चित प्राप्त होते. त्यासाठी जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासाचे समायोजन केल्यास संधीचे सोने निश्चित होईल असे प्रतिपादन कर्जत येथील दादा पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बाळ कांबळे यांनी केले.

नगर येथील राधाबाई काळे महिला महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे उद्घाटन प्राचार्य डॉ. कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले. त्या प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य.डॉ. दिनानाथ पाटील होते. या कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. बी.के.औटी, डॉ.एम.बी.करांडे, प्रा. संतोष लगड, प्रा. साळुंके

आदि उपस्थित होते.

यावेळी डॉ. कांबळे म्हणाले, कोणतीही स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण करणे शक्य असते.मात्र त्यासाठी योग्य नियोजन, चिकाटी व परिश्रम यांची आवश्यकता असते. म्हणून स्पर्धा परीक्षांची तयारी कशी करावयाची, मुलाखतीचे तंत्र, प्रश्नांचे आकलन, निबंध कसा लिहावा, त्याचबरोबर भारतीय राज्यघटनेतील हक्क, अधिकार, घटना दुरुस्ती, भारताचे परराष्ट्रीय धोरण, इंग्लंड व चीन मधील शासन याबाबत त्यांनी विवेचन केले. स्पर्धात्मक युगामध्ये टिकण्यासाठी कठोर मेहनत आवश्यक आहे. यु.पी.एस.सी, एम.पी.एस.सी व आय.बी.पी.एस. या परीक्षांची संपूर्ण संरचना आणि प्रशासन, समाज, सद्यकालीन घडामोडी यातील महिलांचे स्थान, संधी बद्दल आणि व्यक्तिमत्त्व विकास या विषयी त्यांनी अत्यंत बारकाईने मार्गदर्शन केले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य दिनानाथ पाटील म्हणाले की, विद्यार्थिनींनी स्पर्धा परीक्षामधून यश संपादन करुन समाज व्यवस्थेत बदल घडवून आणणाऱ्या प्रशासनात आपले योगदान द्यावे. विद्यार्थिनींनी स्वावलंबी बनावे. त्यासाठी महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राची स्थापना केली आहे. याचा विद्यार्थिनींनी लाभ घ्यावा.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक प्रा. अमोल बुचुडे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. रविप्रकाश ठोंबरे यांनी केले तर आभार प्रा. सचिन कोतकर यांनी मानले.

## महिलांचे शोषण थांबविणे ही काळाची गरज अॅड. वर्षा देशपांडे



अॅड.वर्षा देशपांडे यांचे स्वागत करताना प्राचार्य डॉ.दिनानाथ पाटील



टरफल एकांकिकेचे सादरीकरण

स्त्री ही समाजव्यवस्थेचा कणा असतो आणि रयत शिक्षण संस्थेचे राधाबाई काळे महाविद्यालय हे विशेष बाब म्हणून महिलांसाठी स्थापन केलेले आहे. या महाविद्यालयात ह्या मुली शिक्षण घेत आहेत. हे पाहता मनस्वी आनंद होत आहे परंतु धर्माच्या, रुढीच्या परंपरेच्या नावाखाली स्त्रियांचे मोठ्या प्रमाणात शोषण केले जात आहे. ते थांबले पाहिजे यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न केले पाहिजे असे आवाहन सातारा येथील अॅड. वर्षा देशपांडे यांनी केले.

राधाबाई काळे महिला महाविद्यालयात दोन एकांकिका सादर करण्यात आल्या. त्या प्रसंगी अॅड. वर्षा देशपांडे बोलत होत्या. या एकांकिकांचे उद्घाटन श्री. अशोक बाबर यांनी केले. अॅड.वर्षा देशपांडे यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य दिनानाथ पाटील यांनी ग्रंथ भेट देऊन स्वागत केले.

महाराष्ट्रातील ऊसतोड कामगारांचे स्थलांतरामुळे काही ठिकाणी मुलींचे बालविवाह होत आहेत. ही दुःखाची बाब आहे. असे बालविवाह रोखण्यासाठी समाजातील प्रत्येकाने पुढाकार घेऊन ही अनिष्ट प्रथा बंद पाडण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे असेही त्या म्हणाल्या.

महाविद्यालयामध्ये सावित्री मैत्रीणी कृतीमंचामार्फत लिंगभेदाच्या समूळ उच्चाटनासाठी विशेष कार्यक्रम सादर करण्यात आला. या प्रसंगी दोन एकांकिका विद्यार्थिनींसमोर सादर करण्यात आल्या. श्री. राजीव मुळे लिखित टरफल व फाईव्ह डब्ल्यु वन एच ह्या एकांकिका सादर करण्यात आल्या. मराठवाड्यातील ऊसतोड कामगारांच्या मुलींना शिक्षण मिळत नाही. त्यांचे आई वडील ऊसतोडीला जातात व जबाबदारीतून मुक्तता यासाठी मुलींचे बालविवाह ही लावले जातात. व त्यांच्या जीवनाला बंदिस्त केले जाते. आजही स्त्रीचे परावलंबीत्व दृढ राहण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. अशा मुलींची व्यथा या एकांकिकामधून मांडण्यात आली. या एकांकिका मधून बालविवाह झालेल्या मुलींची वेदना प्रत्यक्ष सादर करुन प्रेक्षकांना अंतर्मुख केले.

## कु. वृषाली गायकवाड नेट परीक्षा उत्तीर्ण



जुलै 2018 मध्ये मराठी विषयात नेट परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल सत्कार करतांना प्राचार्य डॉ. दिनानाथ पाटील समवेत प्रा.सचिन कोतकर व प्राचार्य विजय गायकवाड

## बाभूळ बनातील कळ्या...

फुलांच्या बनातून बाभूळ बनात चालल्यात
इवल्याशा कळ्या आता खुलताहेत काट्यात
फुटाफुटांवर बाभळी छान बहरलेल्या आहेत
काट्या काट्यांचा सडा खाली पडलेला आहे
काटे वेचत वेचत पुढे आता चालल्यात
इवल्याशा कळ्या आता खुलताहेत काट्यात

बाभळीच्या संगतीत गवतही डोलतय
सरटेही आता गवतात दडून बसलेत
टोचलेला सराटा खुडून पुढे आता चालल्यात
इवल्याशा कळ्या आता खुलताहेत काट्यात

सारुनही बाजूला काटे मोडताहेत पायात
रक्ताळलेले पाय तरी चालले आहे थाटात
काट्यानेच काटा काढून पुढे आता चालल्यात
इवल्याशा कळ्या आता खुलताहेत काट्यात

- कु.प्रगती मिसाळ
तृतीय वर्ष कला

## मैत्रीण

आज मला तू नकळत
माझी वाटायला लागली
माझ्यापासून दूर तू जाऊ नये
क्षणा क्षणाला बोलणारे मन माझे
कॉलेज सुटल्यावर
जेव्हा आपल्याला घरी जायची वेळ येते
तेव्हा उद्या कधी भेटशील अशी
लागली हुर हुर तुझी मला
सखे काय आहे असं तुझ्यात
नकळतच मी तुझ्यात बांधले गेले
तुझं गोड बोलणं
माझ्यासाठीच हसणं
खूप खूप आठवत
वेडे एक सांगू का तुला
मला तू खूप आवडतेस
जेव्हा मी तुला पहिल्यांदा
माझ्या डब्यात जेवायला घेतल ना
तेव्हा काहीच वाटलं नाही
पण मैत्री झाल्यावर कळलं
हिच तुझी अन् माझी पहिली भेट
तू जेव्हा नसतीस ना जवळ
तेव्हा खूप खूप एकटं वाटत गं
तुझ्या असण्यानं आपलसं वाटत
तू चांगली आहे की वाईट
हे नाही कळलं
शामासारखी माझ्यात आली
हे मात्र मला कळाल
सखे खूप गोड आहेस गं तू
माझ्या प्रिय सखीस

## बाप

काळ्या कुट्ट रात्रीच्या अंधारात
अंथरुणावर डोक टेकून
लेकरांच्या भविष्याचा विचार करणारा
रक्ताचं पाणी करुन
लेकरांना स्वावलंबी करणारा
क्षणोक्षणाला ठेचा खाऊन
आपणाला मार्ग दाखवणारा
एखादी गोष्ट लेकराला मिळावी
म्हणून, जगासोबत लढणारा
टपोरे डोळे करुन
लेकरु रडू नये
म्हणून शब्दांचा मारा करताना हृदयातून घायाळ झालेला
माय जरी कळस असली
तरी तो घराचा पाया असतो
आई जरी वादळ होऊन उठली तरी
तो एक गारवा होऊन वाहत असतो
आई आई आहे
बाप बाप आहे
तोच आहे शब्दातही बसत नाही
तोच आहे कितीही लिहिलं तरी संपत नाही
तोच आहे फक्त माझा बाप
सगळे झोपले की
अंथरुणात उठून अलगद
मायेचा हात फिरवणारा तोच असतो
मावळलेला सूर्य
उद्या उगवणार आहे
हे सांगणारा तोच असतो
रात्रीच्या अंधारात जागून
उद्याचं उज्ज्वल भविष्य दाखवणारा तोच माझा बाप असतो

- कु.गीता गाडेकर
प्रथम वर्ष बी.एस्सी

## उद्वेग बळीराजाचा

- सांगा आम्ही कसं जगायचं -
न्यायाच्या नावाखाली जातीजातीचे मोर्चे निघतात, हाहाकार माजवतात
हक्क मागणारे बाजूलाच राहतात अन सत्ताधारी - विरोधक टिका सुरु करतात
आम्ही गरीब माणसं ओ,
आम्ही अन आमच्या पोरांनीबी फक्त पहात राहायच ।
सांगा आम्ही कसं जगायचं
आश्वासनांचा बाजार भरतो, निसर्गही खेळ मांडतो,
रोज नवीन संकटे झेलतच शेतकरी घाम गाळतो,
उद्वेग जरी झाला तरी भावना कुणालाच कळत नाहीत,
सुरवंटासारखं जीवन झालय कोशाबाहेर पडत नाही.
सांगा आम्ही कसं जगायच
अनेक योजना दरवर्षी नावे बदलून येतात,
फाईलींमध्येच रेंगाळतात अन् घायाळ होतात.
बोलबाला कर्जमाफीचा अनेकदा केला जातो
वाट पहातच बळीराजा स्वतःच बळी होतो.
मग सांगा आम्ही कसं जगायचं

- कु.गीतांजली खाडे
तृतीय वर्ष कला

## मार्ग प्रकाशाचा

आयुष्यात उरलेल्या दिवसाकडे वळून पाहत जा. आयुष्यातील गेलेल्या दिवसाकडे बघून मनस्ताप करत जावू नये. पुढील दिवस चांगले जातील याचा प्रयत्न करावा. आपला जन्म लोकांच्या चुका काढण्यासाठी झालेला नसून मार्ग चुकलेल्या व्यक्तीला मार्ग सांगण्यासाठी झालेला आहे.

एखादे कार्य केले तर, छातीठोकपणे सांगू नका मी हे कार्य केले आहे. कारण तुम्ही जसे करता तसे सगळे करतात. पण तुम्ही अन् अनेक जण मिळून करतात ते थोडं वेगळं असतं कारण तिथे एकता असते. विचार असतात. एकमेकांचा आदर असतो.तुम्ही तुमचं नाव सांगत असताना तुमच्या पाठीशी असणाऱ्या व्यक्तीचे नाव सांगताना तेव्हा समोरचा व्यक्ती म्हणतो छान केलयं. किती एकता आहे ना तुमच्यामध्ये तुम्ही काम सर्व मिळून करता असचं करत जा.

समाजात वावरत असताना आपलं हित पाहत असताना समोरच्या व्यक्तीचही हित पाहत जावे.समोरच्या व्यक्तीचा आदर करायला हवा. तर समाज आपला आदर करील. आपल्या समोर रोज कित्येक व्यक्ती येत असतात. आपण सर्व व्यक्ती

बरोबर आदरानं आणि नम्रतेने वागायला हवं. अनेक अनुभवावरुन आपलं भविष्य बदलत असत. आपण आपल्या रोजच्या जीवनात घडणाऱ्या घडामोडींकडे बारकाईने लक्ष द्यायला हवं. म्हणजे आपण आपल्यावर आलेल्या प्रत्येक प्रसंगाला सामोरे जाण्यासाठी आपण तत्पर राहू शकतो.

आपले आईवडील आपल्यासाठी किती कष्ट सहन करतात. आपण त्यांच्यासाठी काहीतरी करा. त्यांच्याशी प्रेमाचे दोन शब्द बोलत जा. ते थकल्यावर ते स्वत:साठी काही करु शकत नाही. म्हणून त्यांना दोन वेळचं जेवण आपण दिले पाहिजे. ते प्रेमाने स्वीकारतील. आपल्या आयुष्यात एवढ केलं तरी खूप झालं.कुणी तरी येईल आणि काहीतरी नियम करील (कडक) आणि कधीतरी सुधारणा होईल याची वाट पाहत राहण्यापेक्षा स्वत: पासून सुरवात करा. स्वत:मध्ये नियम तयार करा. आपण नक्कीच घडू. आपण घडलो तर आपला समाज घडला, तर आपला देश नक्कीच घडेल.

इतरांसारखे वाचून सोडून देवू नका. आपण इतरंपेक्षा काही तरी वेगळे आहोत अस समजून अनुकरण करावं.

शेवटी पुन्हा एकदा सांगते, स्वत:पासून सुरुवात करा. कुणाचीही वाट पाहू नका. वाट पाहत राहिले तर वाटेतच अंत होईल. ध्येयापर्यंत पोहचायचं असेल तर स्वत:पासून आणि लगेच आहेत त्या स्थितीपासून सुरुवात करायला हवी.

- कु.गीता गाडेकर
प्रथम वर्ष बी.एस्सी.

## विश्र्वास... जीवनाचे एक पान

आजच्या युगात सर्वजण हे भौतिक सुखामागे धावू लागले आहेत. सर्वजण आपल्या जीवनाचे भान विसरलेला आहे. या साठी प्रत्येकाला जीवनाविषयी सांगणे गरजेचे बनले आहे. कारण जीवन जगण्यासाठी आपल्याला विसरलेल्या गोष्टींची आठवण होणे अत्यंत गरजेचे आहे.

आकाशाच्या सरोवरात एक विराट कमलपुष्प आहे. ते म्हणजे आपले जीवन आणि त्या उमललेल्या कमलपुष्पावर एक दवबिंदू पडला त्याचेच नाव म्हणजे जीवनातील विश्वास. मग हा विश्वास म्हणजे काय ? विश्वास म्हणजे आयुष्याच्या उपक्रमांची, चढउतारांची गुरुकिल्ली. जो जगण्यातील आनंद, उत्साह, डोळ्यातले तेज, न भित्रेपण आणि जीवनाची निर्मितीच जणु विश्वास तो मरगळलेल्या मनावर फुटलेली जणू पालवीच.

जीवन जगताना अनेक समस्या येत असतात. आपण त्यांना तोंड देतो आणि द्यावेच लागते. पण कधी कधी आपण कंटाळतो, तडफडतो, नाराज होतो. पण खरं सांगू हे सर्व घडते ते विश्वासामुळे म्हणजेच ज्या वेळेस आपण एखादे काम करण्यासाठी उत्कृष्ट साबीत होत नाहीत. एखादे वाईट काम करतो, नको असलेल्या वाटेवर जातो. त्या प्रत्येक क्षणाक्षणाला विश्वास कारणीभूत ठरतो. कारण जेव्हा आपल्यावर एखादी व्यक्ती जसे आपले आई, बाबा, बहिण, भाऊ, कुटुंबातील, समाजातील व्यक्ती ठेवते तेव्हा आपल्याला जाणीव असते की आपल्यावर कुणीतरी विश्वास ठेवतय मग आपण कोणतेही वाईट काम करुन किंवा वाईट मार्गावर जाण्यासाठी हजारो वेळा विचार करतो. कारण आपण तो विश्वास तोडायला घाबरतो आणि विश्वास तोडत नाही आणि तो विश्वास न तोडणे हेच योग्य असते असे ठरवतो. परंतु जेव्हा आपल्यावर आपले भाऊ - बहीण, आई - वडील, मित्र - मैत्रिणी आणि समाज यातून कुणीही विश्वास ठेवत नाही तेव्हा आपण विचार करतो काही हरकत नाही. वाईट मार्गावर जायला, नको त्या मार्गावर जायला कारण तसेही आपल्यामुळे कुणाचाही विश्वास तुटणार नाही. ज्यामुळे कुणालाही दु:ख होणार नाही असा विचार करुन पुढे जातो.आपण आणि एक दिवस सर्वांच्या नजरेत वाईट बनतो.पण विचार करा ही व्यक्ती जी वाईट बनते ती खरंच वाईट असते का? त्याला वाईट बनविले जाते. तर त्या व्यक्तीला वाईट बनवितात ते त्याचे नाजूक मन. जे खूप मोठ्या गोष्टी झेलू शकत नाही. ज्याला गरज असते कुणाच्यातरी विश्वासाची.

घड्याळाला जशी स्प्रींग असते तशी मानवाच्या जीवनालाही एक स्प्रींग असते. विश्वासाची त्यामुळे एक तर माणूस पूर्णपणे उभा राहू शकतो किंवा थेट बंद पडू शकतो. ज्या प्रमाणे प्रत्येकाला वाटते आपल्यावर सर्वांनी विश्वास ठेवावा त्याप्रमाणे विश्वास ही अशी गोष्ट आहे जो आपण दुसऱ्यांवर दाखवला तर ते त्याचे पालन करतील आणि नको त्या मार्गावर जाण्यापासून वाचतील आणि जर दुसऱ्यांनी आपल्यावर ठेवला तर आपण नको त्या मार्गावर जाणार नाहीत तरच देश घडेल म्हणून विश्वास ही सर्वांनी निश्चितच एकमेकांवर ठेवण्याची गोष्ट आहे. आपण दुसऱ्यांवर आपला विश्वास दाखवला तरच कुणीतरी आपल्यावर दाखवेल.

जसं आपण एखाद्या दुकानात काचेचे भांडे घेण्यासाठी जर गेलो तर ते काचेचे भांडे जेव्हा त्या दुकानदाराच्या हातात असते तेव्हा तो ते नीट सांभाळतो. कारण ते जर पडलं तर त्याचे तुकडे होतील आणि जेव्हा तेच काचेचं भांडे दुकानदाराच्या हातून आपल्या हातात येते तेव्हा आपण ते जपणे आपले कर्तव्य समजतो पण जर आपल्या हातात दुकानदाराने ते दिलेच नाही तर आपण त्याची काळजी करत नाही. तसेच जर एखाद्याने आपल्यावर विश्वास ठेवला तरच आपण त्याचे पालन करतो. असा असतो विश्वास कुणी ठेवला तर सांभाळतो नाहीतर विश्वासघात हा मुळातच असतो. जसे जेथे नदी नसते तेथे पाणी नसते, जेथे झाड नसते तेथे प्राणी नसतात, पक्षी नसतात. तसेच जेथे विश्वास नसतो तेथे विश्वास नसतो तेथे विश्वासघातपण नसतोच. म्हणूनच म्हणतात महान व्यक्ती,

सृष्टीत असून दृष्टीत न पडणारे,
नयनापासून दूर असणारे,
हृदयाच्या रम्य बागेत फुलणारे,
पुष्प म्हणजे विश्वास होय.

विश्वास, जीवन एक पुस्तक असतं ज्याचं विश्वास हे एक पान ते पान फाटलं म्हणून पुस्तक तर आपण फेकुन देत नाहीत पण त्या पुस्तकाचे एक एक पान हळूहळू गळून जातात आणि पुस्तक फेकण्याजोगेपण राहत नाही.

- कु.विक्रांती सोनवणे
द्वितीय वर्ष कला

## स्वप्न माझे आय.पी.एस. चे

मला यु.पी.एस.सी (स्पर्धा परीक्षा) उत्तीर्ण होऊन मला एक आय पी एस ऑफीसर व्हायचं आहे. मी एक सर्वसामान्य घरातील सामान्य मुलगी आहे. माझे वडील एका कंपनीमध्ये मॅनेजर म्हणून कार्यरत आहेत.आई एक गृहिणी आहे. ती वडिलांच्या कंपनीत काम करते. आई - वडिलांना वाटतं मी एक यशस्वी मुलगी बनावं. ही इच्छा मी नक्कीच पूर्ण करीन.हे माझं स्वप्न नसुन माझी जिद्दच आहे आय.पी.एस. होण्याची......

आज जर समाजात पाहीलं तर प्रत्येक लोकांना वाटतं की मी काहीच करु शकत नाही. खूप कमी दर्जा मुलींना दिला जातो. तिला शून्य समजलं जातं. पण त्या लोकांना शुन्याची किंमत कधीच माहीत नाही. आज जर आपण पाहीलं तर 10 अंक खुप मोठा आहे. त्याचं कारण असं की 1 पुढे जर शून्य लिहला नसता, तर त्याची किंमत वाढली नसती म्हणून मला वाटते की, समाजामध्ये कोणीही कधीही अतिहुशार म्हणण्याऐवजी जर शुन्य म्हटले तर त्या शुन्याची किंमत खुप वर आहे.

मला युपीएससी परिक्षा उत्तीर्ण होऊन आय.पी.एस व्हायची जिद्द आहे. कारण त्या शुन्याची किंमत खुप वर आहे.

मला यु.पी.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण होऊन आयपीएस व्हायची जिद्द आहे. खूपजन म्हणतात, कि माझं स्वप्न डॉक्टर आहे, इंजिनिअर आहे इ. स्वप्न हे प्रत्येकजन सांगतात, मला वाटत स्वप्न म्हणण्याऐवजी जर प्रत्येकाने माझं स्वप्न नसून तर माझी जिद्द आहे, ते माझं ध्येय आहे आणि ते मी मिळवणारच अशी जिद्द असावी मला आयपीएस व्हायचं हे माझं स्वप्न नाही तर माझी जिद्द आहे. जी मला पूर्ण करायचीच..... मला वाटते स्वप्न पाहण्याचा इतकाच छंद असेल तर झोपून स्वप्न पाहण्याऐवजी ते स्वप्न आपण जागे राहून असं स्वप्न पाहवं की त्या स्वप्नांना झोप सुद्धा येणार नाही असे मला माझ्या शिक्षकांनी सांगितले होते. माझे शिक्षक नेहमी मला सांगायचे, तू किती शिकलीस याला महत्त्व नसून तू कशा प्रकारे शिकली काय शिकली हे महत्त्वाचे आहे. हेच जर तुला समजलं तर यश हे तुझ्याच हाती आहे, सर नेहमी सांगायचे कि तूच आहेस तुझ्या जिवनाचा शिल्पकार. मला माहीत आहे की मी युपीएससी करुन आय.पी.एस. व्हायचं

हे तर मला माहितच असते. ज्याप्रमाणे नाण्याला दोन बाजू असतात, त्याप्रमाणे एक बाजू माहिती पण दुसरी ही रिकामी जी मला माहीत नाही. मला युपीएससी चा सर्व अभ्यासक्रम आजही माहित नाही. कोणती पुस्तके वाचावी लागतात, काय करावे लागते, किंवा अभ्यास कसा करावा हे माहीत नाही, पण नशीबाने मला राधाबाई काळे महिला महाविद्यालयात सर्व मिळाले.

त्याचबरोबर, शिक्षक चांगले भेटले पण मला सरांना युपीएससी बद्दलची माहिती विचारण्याची भिती वाटते. आपल्या बद्दल सर काय विचार करतील, या भितीने माझ्यात कधीच आत्मविश्वास आला नाही. पण मला माहिती आहे, जर मी सरांना युपीएससी बद्दलची माहिती विचारली तर मला सर सर्व माहिती नक्कीच सांगतील व त्याचबरोबर मला मार्गदर्शन करतील पण मला त्याबद्दल स्वत: अभ्यास करुन सर्व माहिती मिळून मला माझा आत्मविश्वास वाढवायचा आहे म्हणून मी जिद्दीने माहिती प्राप्त करणार आहे आणि सरांकडून मग मार्गदर्शन घेणार आहे.

प्रा. बुचुडे सर यांनी अनेकदा आम्हाला युपीएससी चे व्याख्याने ऐकवली, आम्हाला त्याबद्दलची माहिती मिळावी, ज्ञान वाढावे यासाठी सरांनी खूप व्याख्याने ठेवली. त्या व्याख्यानाने माझा खूप आत्मविश्वास वाढला. अशा या सरांना माझा साष्टांग नमस्कार करते.

अहंकाराचा वारा न लागे ज्याला असा तो एक शिक्षक

धन्यवाद आई वडिलांना, माझे शिक्षक प्रा.बुचुडे सर व प्रा.घंगाळे सरांना ज्यांनी माझा आत्मविश्वास वाढवला. आज ही शब्दरचना मांडू शकले नसते. तुम्हा सर्वांच्या मार्गदर्शनाने माझ्यामध्ये आत्मविश्वास निर्माण झाला व मी व्यक्त होऊ शकले.

माझं स्वप्न हे आयपीएस होण्याचे आहे. मी आयपीएस झाल्यावर माझ्या आईवडिलांना माझी ही पहिला शिदोरी असेल.

ओळख माझी स्वत:ची
मी एक विद्यार्थिनी आहे
ज्ञानार्जन हे माझे कर्तव्य
चिंतन, सदाचार ही माझी साधन
जिद्द प्रामाणिक प्रयत्न ही माझी पूजा आहे.
धन्यवाद (स्वप्न माझे आयपीएस चे )....

- कु. प्रतीक्षा गायकवाड
प्रथम वर्ष कला

## हुंडा एक सामाजिक समस्या

हुंडा ही एक आजच्या समाजाला ग्रासणारी एक जीव-घेणी समस्या आहे. पुरातन काळापासून आजपर्यंत हुंड्याची ही अघोरी रूढी चालू आहे. प्राचिन काळी विवाह म्हणजे कन्यादान असे मानले जात. असे त्यामुळे मुलीची सासरी पाठवणी करताना तिच्या बरोबर धं, धान्य, गाई, इत्यादी गोष्टी दिल्या जात. आईवडिलांची संपत्ती वारसा हक्काने मुलाकडे जात अहे. तीथे तरीही मुलीचा काहीही हक्क नसे ही कमतरता दीर करण्यासाठी लग्नाच्या वेळी हुंडा दिला जाई हा एक प्रकारे आईवडीलांच्या संपत्तीतील मुलीचा वाटा असे.

आज मात्र या गोष्टीला पूर्ण विकृत वळण लागले आहे.मुलाचे लग्न म्हणजे घबाड मिळवणे अशी चुकीची समजूत दिली साली आहे. माणसातील मानव हरवत वराच्या मागण्या पूर्ण करतात पण त्या भस्मासुराची भूक वाढतच जाते. मग लग्नानंतर मुलीचा छळ सुरू होतो. तिला आत्महत्येला प्रवृत्त केले जाते वा तिची हत्या केली जाते.

हे महाभयानक सत्य आहे. आणि म्हणूनच हुंडा ही एक भयंकर समस्या आहे. हुंडा घेणे म्हणजे स्वत:ला विकणे स्वत:ची किमंत करूण घेणे आजकालमुलिंनी आपली पात्रता सिद्ध केलेली आहे. अलीकडे अनेक घरात अस दिसुन येते की लग्न करून येणारी मुलगी घराला पोसते घराच्या उत्पन्नाथ भर घालते.

अडीअडचणीत समर्थपणे ती घराला सावरते. असे आहे, तर मग स्त्रीला भार का समजावे ? तिच्याकडून हुंड्याची अपेक्षा का ?

कुटुंबात स्त्री पुरूष समान असतात. पत्नीला अर्धांगी म्हटले जाते. पण प्रत्यक्षात मात्र पुरूषाला श्रेष्ठ समजतात. व स्त्रीला कनिष्ठ समतात. समाजाच्या प्रत्येक व्यवहारातच हे वआस्तव स्पष्टपणे दिसते. हुंडा हे या वास्तवाचे एक रूप आहे. या हुंड्यामुळे कित्येकदा कुटुंबेच्या कुटुबे उद्‌ध्वस्त झाली आहेत. त्यामुळे मुलीचा जन्म ही एक आपत्ती मानली जाते. तिला या जात येण्यास प्रतिबंध केला जातो वा जगात आलेल्या स्वत:च्या कन्येचा गळा घोटून तिला जगातून हद्दपार केले जाते.म्सणून प्रत्येक सुज्ञ माणसाने या हुंड्याला हद्दपार केले पाहिजे.

हुंड्याला विरोध करणारा कायदा सरकारने केला आहे. पण या काद्याकडे लोकांचे दुर्लक्ष होते. समस्येविरूध्द काही सामाजिक स्त्री संस्था आजही काम कीत आहेत पण ते प्रयत्न पुरेसे नाहीत. त्यासाठी मोठी क्रांती व्हायला हवी. समाजातील सर्व लोक त्यासाठी एकत्र यायला हवे. समाजातील तळागाळापर्यंत प्रबोधनाचे कार्य पोहचवायला हवे.

- कु.निशिगंधा काळे
प्रथम वर्ष वाणिज्य

दि प्रेस अँण्ड रेजिस्ट्रेशन ऑफ बुक्स
नियम ८ फॉर्म नं. ९ नुसार
सदर वार्तापत्र हे खासगी वितरणासाठी असून स्वप्नील प्रिंटर्स
यांचेकडून २०० अंक मुद्रित केले आहेत.
प्रकाशन हक्क : प्राचार्य डॉ. दिनानाथ पाटील,
मुद्रण : स्वप्नील प्रिंटर्स, अ.नगर ७२७६००५४०९